महाराष्ट्र जनशक्ति

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ति

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २४५ वे | दिनांक : ०१/०९/२०२६ | वार : मंगळवार

## मनोज जरांगेंच्या उपोषणाचा तिसरा दिवस; १२ तारखेपर्यंत मुंबईत येण्याचे आवाहन



**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटी येथील ११व्या आमरण उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. जरांगे पाटील यांनी मराठा बांधवांना आजपासूनच 12 तारखेपर्यंत मुंबईत पोहोचण्याचे आवाहन केले आहे. "थेट आझाद मैदानात जाऊ नका. मराठे मुंबईत आल्याचे कोणालाही समजता कामा नये. पुढील 12 दिवस हे सत्र सुरू ठेवा आणि आपापल्या पाहुण्यांकडे किंवा मित्रांकडे मुक्काम करा," अशी सूचना जरांगेंनी दिली आहे. जर पोलिसांनी कारवाई करून उचलून नेले, तरी न घाबरता बिनधास्त पोलिस स्टेशनमध्ये राहा, तिथेच तुमची राहण्याची सोय होईल आणि कोणाकोणाला उचलले हे मी नंतर बघतो, असेही जरांगे म्हणाले.

आपल्या उपोषणावर ठाम असल्याचे स्पष्ट करत, आपण कोणत्याही परिस्थितीत उपोषण सोडणार नसून थेट मुंबईलाच येणार असल्याची मोठी घोषणा जरांगे यांनी केली आहे. सर्व मराठा बांधवांनी मुंबईत विभागून राहिल्यानंतर, आझाद मैदान, इतर कोणतेही मैदान किंवा थेट मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्यापैकी नेमके कुठे जमायचे, याचा निरोप मी स्वतः तुम्हाला देईन. तो निरोप मिळताच सगळ्यांनी त्या ठिकाणी एकत्र यायचे आहे, अशी रणनीती जरांगे पाटील यांनी जाहीर केली आहे.

दरम्यान, उपोषणस्थळी वडीगोद्री प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभम राठोड व त्यांच्या पथकाने जरांगे यांची तपासणी केली. तपासणीत त्यांची शुगर कमी झाल्याचे समोर आल्याने डॉक्टरांनी त्यांना सलाईन लावण्याचा सल्ला दिला. मात्र, जरांगेंनी उपचार घेण्यास नकार दिला. त्यानंतर दुपारी आणि सायंकाळी गेलेल्या वैद्यकीय पथकालाही त्यांनी माघारी पाठवले. सध्या त्यांचा रक्तदाब, नाडीचे ठोके आणि ऑक्सिजनची पातळी स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज तिसरा दिवस असून, त्यांच्या प्रकृतीकडे सरकारचे लक्ष आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीवर तोडगा काढण्यासाठी सरकारचे शिष्टमंडळ पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेण्याची शक्यता आहे. यापूर्वी झालेल्या चर्चेनंतरही आंदोलन सुरूच असल्याने सरकारकडून पुढील चर्चेसाठी हालचाली सुरू झाल्याचे समोर येत आहे. त्यामुळे या भेटीत काय तोडगा निघतो, याकडे लक्ष लागले आहे.

उपोषणाच्या समर्थनार्थ अंतरवाली सराटीत मराठा बांधवांचे लोंढे सतत दाखल होत आहेत. जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जरांगे यांची भेट घेऊन पाठिंबा दिला. "विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार काय म्हणतात हा त्यांचा प्रश्न, पण माझा जरांगेंना पाठिंबा आहे," असे सांगत काळे यांनी आपल्याच नेत्यांना घरचा आहेर दिला. याशिवाय बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनीही भेट घेतली. यशवंत संघर्ष सेनेने वडीगोद्री ते अंतरवाली अशी पारंपरिक वाद्यांच्या गजरात रॅली काढत जरांगे पाटील यांना पारंपरिक काठी व घोंगडी देऊन जाहीर पाठिंबा दिला.

## मोदी सरकारवर वडेट्टीवारांचा आरोप; OBC विद्यार्थ्यांवर अन्याय



**नागपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात ओबीसी समाजावर प्रचंड मोठा अन्याय होत आहे. २०१६ मधील यूपीएससी परीक्षेत मेरिटवर उत्तीर्ण झालेल्या तब्बल ३१४ ओबीसी विद्यार्थ्यांना नॉन-क्रिमीलेअरच्या अटीचे कारण दाखवून आयएएस आणि आयपीएस होण्यापासून रोखण्यात आले, असा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. हे सरकार मनुवादी विचारांचे असून त्यांना बहुजन अन् ओबीसी समाजाशी काहीही देणेघेणे नाही.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, २०१६ मध्ये युपीएससीची परीक्षा झाली आणि जवळपास ३१४ विद्यार्थी ओबीसीमधून पास झाले त्यांना तुम्ही क्रिमिनेअरच्या अटीमध्ये बसत नाही मर्यादेच्या आतमध्ये तुम्ही नाही म्हणत त्यांनी आयएएस आणि आयपीएस होण्यापासून वगळण्यात आले, त्यांना जॉईन होऊ दिले नाही. ही सर्व मुले मिरीटवर सिलेक्ट होऊ शकली असती पण तसे करण्यात आले नाही. ओपनच्या कमी मार्क असलेल्या मुलांना युपीएससीच्या परीक्षेत पास करण्यात आले आणि त्यांना प्रशासकीय पदांवर रुजू करण्यात आले. हे सरकार मनुवादी विचारांचे सरकार आहे त्यांना बहुजन आणि ओबीसींचे काही देणेघेणं नाही.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, मोहन भागवत यांना देशात बोलण्याची संधी नाही ते न्युयार्कमध्ये जाऊन बोलतात. आमच्या पक्षाचे अध्यक्ष एक कार्यक्रम घेतात तिथे जात शुद्धीकरण करण्यात येते त्यावर अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला पाहिजे. राहुल गांधी यांनी यावर आवाज उठवला तर त्यांच्यावर टीका करतात त्यांच्यावर गुन्हा दाखल करतात हे चुकीचे आहे. राहुल गांधी यांचा आवाज तुम्ही असे गुन्हे दाखल करत दाबू शकत नाही. काँग्रेस सरकार असताना हिंदूंना कधी भीती वाटली नाही. पण आता वाटत आहे हे बोगस लोकं आहेत. हिंदू म्हणणाऱ्या लोकांनी जिन्नासोबत निवडणूक का लढवली. सर्व धर्मांच्या लोकांना आपल्या धर्मांसाठी काम करता आले पाहिजे. धार्मिक तेढ निर्माण करणे हा गुन्हा असावा अशी भूमिका घेतली पाहिजे. देशाची परिस्थिती गेल्या १२ वर्षांमध्ये अतिशय खराब झाली आहे. केवळ विश्वगुरू म्हणून काही होत नसते, केवळ बोलून काही होत नसते त्यासाठी काम करावे लागते.विजय वडेट्टीवार म्हणाले की, मोहन भागवत यांनी अमेरिकेत जे वक्तव्य केले तसे इथे वागले पाहिजे. महाराष्ट्रातील मंत्री सांगतात की हा आमचा देश आहे, इतर धर्मीय इथे राहु शकत नाही. सहिष्णू म्हणत साताऱ्यात मशिदीमध्ये घुसत एका इंजिनिअरचा खून करण्यात आला. भागवत यांनी देशात विचार पेरताना चांगले विचार मांडावे बाहेर देशात वेगळे आणि आपल्या देशात एक असे असून नये.

## लेकींच्या भविष्यासाठी आईची अनवाणी मॅरेथॉन; ४७ वर्षीय रमाबाईंची प्रेरणादायी कामगिरी

**अंबाजोगाई :** सकाळची वेळ... मॅरेथॉनसाठी तरुण-तरुणींची लगबग सुरू होती. कुणी धावण्याआधी शरीर गरम करण्यासाठी उड्या मारत होते, कुणी बुटांच्या नाड्या घट्ट बांधत होते, तर कुणी स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी सज्ज होत होते. त्याचवेळी साधी साडी नेसलेली एक महिला तिथे आली. पायात साध्या स्लीपर होत्या. तिला पाहून कुणालाही ही महिला स्पर्धेत धावेल आणि चक्क पहिला क्रमांक पटकावेल, असे वाटले नसते. पण शिट्टी वाजली आणि पुढच्या काही मिनिटांत या महिलेने उपस्थितांना जिद्द, संघर्ष आणि मातृत्वाचा असा धडा दिला की, अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. ही कहाणी आहे बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील ४७ वर्षीय रमाबाई रणवीर यांची. पतीच्या निधनानंतर दोन मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी खांद्यावर घेतलेल्या रमाबाई आजही आपल्या लेकींच्या भविष्यासाठी अहोरात्र कष्ट करत आहेत. उदरनिर्वाहासाठी त्या एका अकादमीत स्वयंपाकी म्हणून काम करतात. मात्र, परिस्थिती कितीही कठीण असली तरी मुलींना शिकवायचेच, हा निर्धार त्यांनी सोडलेला नाही. याच संघर्षातून उभ्या राहिलेल्या रमाबाईंनी अंबाजोगाईत झालेल्या 'अमृत दौड' मॅरेथॉनमध्ये अनवाणी धावत प्रथम क्रमांक पटकावला आणि मिळालेले 3 हजार रुपयांचे बक्षीसही मुलींच्या शिक्षणासाठी उपयोगी पडणार आहे. त्यामुळे ही केवळ मॅरेथॉनमधील एका महिलेची विजयकथा नाही, तर आपल्या मुलींच्या भविष्यासाठी धावणाऱ्या एका आईच्या जिद्दीची हृदयस्पर्शी कहाणी आहे. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या खोलेश्वर शैक्षणिक संकुलाच्या अमृत जयंती वर्षानिमित्त अंबाजोगाईत 'अमृत दौड' मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते भाग्यनगर चौक या मार्गावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत मोठ्या संख्येने तरुण-तरुणी सहभागी झाले होते. रमाबाईही या स्पर्धेत सहभागी झाल्या.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०१ सप्टेंबर २०२६


## 'आर्टिकल 15' हा ग्रंथ आरक्षणवाद्यांना बळ देणारा: डॉ. ऋषिकेश कांबळे



**छत्रपती संभाजीनगर** : 'आर्टिकल 15' हा ग्रंथ आरक्षणवाद्यांना बळ देणारा आणि संविधानाची साक्षरता वाढविणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक व आंबेडकरी विचारवंत डॉ. ऋषीकेश कांबळे यांनी केले. महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद' आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'संवाद' या सृजनशील उपक्रमात डॉ. ह. नि. सोनकांबळे लिखित 'आर्टिकल 15' ग्रंथावर 'संवाद' हा विशेष कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते.पुढे बोलताना डॉ. कांबळे म्हणाले की, सध्याच्या काळात आरक्षणावर अनेक आक्षेप घेतले जात असून संभ्रम निर्माण केला जात आहे. या सर्व प्रश्नांना 'आर्टिकल 15' हा ग्रंथ उत्तम उत्तर आहे. त्यामुळे आरक्षणाची लढाई लढणाऱ्या प्रत्येकाला संविधानिक मुल्यावर संघर्ष करण्यासाठी हा ग्रंथ दिशा देतो. सर्व कार्यकर्त्यांनी या ग्रंथाचे वाचन व चिंतन केले पाहिजे. मानवी हक्क, व आरक्षणवादयाच्या लढाईला हा ग्रंथ वैचारिक बळ देणारा ग्रंथ आहे.असे ते म्हणाले.प्रमुख वक्ते प्रा. श्रीकृष्ण मोरे म्हणाले की, 'आर्टिकल 15' हा आपल्या जगण्याशी संबंधित विषय आहे. हे कलम संविधानात समाविष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या संघर्षाची ही कहाणी आहे. आंबेडकरांचा खरा उद्देश केवळ आरक्षण देणे हा नसून राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेला गती देणे हा होता. लेखकाने आंबेडकरांच्या राष्ट्रनिर्मितीच्या सिद्धांताला केंद्रस्थानी ठेवून या ग्रंथाची निर्मिती केली आहे. त्यामुळे "आरक्षणामुळे देशाचे तुकडे होतात" हा आरक्षणविरोधकांचा दावा या ग्रंथातून अनेक संदर्भांसह खोडून काढला आहे.नागसेनवन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. नवनाथ गोरे, साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. मोहन सौंदर्य आणि सचिव डॉ. युवराज धबडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. ह. नि. सोनकांबळे यांच्या साहित्यिक व वैचारिक योगदानावर सखोल चर्चा झाली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नागनाथ करडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शिवाजी डोळसे यांनी तर आभार डॉ. पंकज शिंदे यांनी मानले. पाहुण्याचा परिचय डॉ. योगिता देवगिरीकर,डॉ. बाळासाहेब गायकवाड यांनी केला यावेळी प्राध्यापक,विद्यार्थी आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. सुरेश पांडुरंग रसाळे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ संपन्न



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले)** : अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट, तालुका -मुळशी, जिल्हा- पुणे. येथे रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक सन्माननीय डॉक्टर सुरेश पांडुरंग रसाळे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ आज संपन्न झाला. हडपसर, आकुर्डी, आदी ठिकाणी छत्तीस वर्षांची प्रदीर्घ सेवा केली. सत्कार सोहळ्याच्या मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर लोगो, निवृत्त प्राचार्या, रसाळे वहिनी उपस्थित होत्या.ओतूरचे रहिवासी असलेले डॉक्टर रसाळे सर यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासाचा पट उलगडताना अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून मी शिक्षण घेतलं. माझ्या घरासमोरच दारू विक्रीचे दुकान होते. तरीही माझ्या आईच्या संस्काराच्या शिदोरीमुळे मी यशस्वी झालो. दहावीला 52टक्के गुण पडल्यामुळे अकरावी विज्ञानला प्रवेश पहिल्या दिवशी गेल्यावर कमी टक्केवारी असल्याने मिळत नाही असे सांगितले. परत दुसऱ्या दिवशी आग्रह केल्यावर कसातरी प्रवेश मिळाला. त्यानंतर बीएस.सी., एमएस. सी., पीएच.डी. होऊन मी यशस्वी प्राध्यापक झाल्याचे त्यांनी सांगितले.डॉक्टर रसाळे सरांना शिकवलेले त्यांचे गुरु ,डॉक्टर रसाळे सरांचे विद्यार्थी, सहकारी मित्र अशा तीन पिढ्या समारोप कार्यक्रमामध्ये उपस्थित होत्या.काल मी कोल्हापूरला कार्यक्रमासाठी गेल्यावर सरांनी आजच्या कार्यक्रमाचे निमंत्रण आठवणीने दिले. मलाही या मंचावर मनोगत व्यक्त करण्याची संधी मिळाली... माझा मुलगा योगेश याला रसायनशास्त्र शास्त्र विषयात पीएच.डी. करण्यासंदर्भात मी पहिल्यांदा रामकृष्ण मोरे महाविद्यालयात ,आकुर्डी येथे त्यांना भेटलो. त्यावेळी सर रसायनशास्त्राचे विभाग प्रमुख होते. आमचे स्नेही प्राचार्य डॉक्टर राजेंद्र गुरव यांचा संदर्भ देऊन मी त्यांची भेट घेतल्यावर त्यांनी लगेच होकार देऊन दरम्यान पीएच.डी.साठी त्यांचे सहकारी डॉक्टर गाढवे सरांना मार्गदर्शक म्हणून देऊन अनमोल असे सहकार्य केले.नोकरी लागली की माणसं चाकोरी सोडत नसतात. घर आणि गावाला परागंदा होतात. इकडचं तिकडचं पाहत नसतात पण सर मात्र याला अपवाद आहेत. सामाजिक कार्यक्रम, कौटुंबिक कार्यक्रम ,वेगवेगळे समारंभ यांना ते जातीने सक्रिय सहभागी होतात. अतिशय स्वागतशील, शांत, संयमी ,अहंकाराची बाधा न झालेले असं व्यक्तिमत्व म्हणजे डॉक्टर रसाळे सर...निवृत्तीनंतरच्या प्रवासासाठी आरोग्यदायी आणि आनंददायी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या वतीने डॉक्टर रसाळे सर आणि रसाळे वहिनी यांचा शाल ,मानपत्र ,पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.निवृत्तीनिमित्त डॉक्टर रसाळे सर यांना शाल, आहेर रसाळे वहिनी यांना महावस्त्र देऊन पाटील कुटुंबीयांच्या वतीने सन्मान केला.रसाळे सरांच्या चिरंजीवाने नुकतेच सुरू केलेल्या हॉटेलमधील सुरुची भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर सरांचा निरोप घेतला.





Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०१ सप्टेंबर २०२६


# राष्ट्रपती पदकाचे मानकरी डॉ. दिगंबर प्रधान यांचा सत्कार



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : डॉ. दिगंबर प्रधान, (आय.पी.एस. )पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, परीक्षेत्र नागपूर यांना त्यांनी बजावलेल्या दैदिप्यमान कर्तव्यामुळे नुकतेच राष्ट्रपती पदक घोषित झाल्याबद्दल त्यांच्या जन्मभूमीत कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील सिद्धनेर्ली गावी सत्कार सोहळ्याचे आयोजन आज करण्यात आले होते. माननीय हसन मुश्रीफ साहेब, मंत्री, वैद्यकीय शिक्षण आणि माजी आमदार संजयबाबा घाडगे यांच्या हस्ते त्यांचा मानपत्र, शाल देऊन सन्मान करण्यात आला. आदरणीय डॉक्टर दिगंबर प्रधान आणि त्यांच्या मित्रांनी बालपणापासून ते वर्तमान काळापर्यंतच्या विविध आठवणींना उजाळा दिला.ग्रामीण भागातून सामान्य परिस्थितीतून आपले चौथीपर्यंतचे शिक्षण गावी झाल्यानंतर माध्यमिक शिक्षण गावाजवळच्या जिल्हा परिषद शाळेत पूर्ण करून महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर येथे घेतले शिक्षण घेत असताना विशेष गुणवत्ता संपादन केली आणि मिरज येथे वैद्यकीय महाविद्यालयाला प्रवेश मिळाला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर वैद्यकीय अधिकारी म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये ग्रामीण रुग्णालयात मुक्कामी राहून रुग्णांची सेवा केली. दरम्यान आदरणीय रवींद्र खेबुडकर यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातून निवड झाली. त्यांच्या प्रेरणेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन पोलीस सेवेत दाखल झाले.सेवा करताना मानवतावादी दृष्टिकोन ठेवून प्रामाणिकपणे अनेक गुन्ह्यांचा यशस्वी तपास केला.साहेबांनी सदर कार्यक्रमाचे आठवणीने आणि आग्रहाने निमंत्रित केल्याने मलाही या सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याची संधी आदरणीय सुरेश खेबुडकर यांच्या समवेत मिळाली.

# नांदेड येथील व्हॉइस ऑफ मीडिया कॅडर कॅम्पमध्ये सचिन रायपत्रीवार यांचा सन्मान



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : नांदेड येथे व्हॉइस ऑफ मीडिया (VOM) इंटरनॅशनल फोरम, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने नांदेड येथील आनंद सागर मंगल कार्यालयात आयोजित कॅडर कॅम्पमध्ये जिंतूर तालुका अध्यक्ष तथा पत्रकार सचिन रायपत्रीवार यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.पत्रकारांच्या हितासाठी, पत्रकार एकता बळकट करण्यासाठी तसेच संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी सचिन रायपत्रीवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. पत्रकारांना न्याय मिळवून देणे, संघटनेची एकजूट वाढविणे आणि पत्रकार सन्मानाच्या चळवळीला नवी दिशा देण्यासाठी त्यांच्या योगदानाचा गौरव सन्मानपत्रातून करण्यात आला.यावेळी व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय अध्यक्ष अनिल मस्के, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया, मराठवाडा अध्यक्ष डॉ. गणेश जोशी, महिला अध्यक्षा वैशाली पाटील, दिव्या भोसले यांच्यासह विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी व मान्यवर पत्रकार उपस्थित होते.कॅडर कॅम्पमध्ये संघटनात्मक बांधणी, पत्रकार कल्याण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी मिळालेल्या सन्मानाबद्दल सचिन रायपत्रीवार यांनी संघटनेच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानत पत्रकारांच्या हितासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# बीड जिल्ह्यात प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध; एकूण मतदारांची संख्या १९ लाख ५३ हजार ४२०

**बीड (भगवंत पाळवदे)** : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, दिनांक १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रम बीड जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत आज, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्ह्याची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.जिल्हा निवडणूक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात एकूण १९ लाख ५३ हजार ४२० मतदारांची नोंद झाली आहे. यामध्ये १० लाख ३५ हजार ९५९ पुरुष मतदार, ९ लाख १७ हजार ४४१ स्त्री मतदार आणि २० इतर मतदारांचा समावेश आहे.विधानसभानिहाय मतदार संख्या खालीलप्रमाणे: * गेवराई: ३,४५,९६६ * माजलगाव: ३,१४,६६८ * बीड: ३,०४,६६० * आष्टी: ३,६०,९०६ * केज: ३,४०,११९ * परळी: २,८७,१०१ASDD मतदारांची माहितीज्या मतदारांनी BLO कडे गणनापत्रक (Enumeration Form) जमा केलेले नाही, अशा २ लाख ४० हजार ४७७ मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट नाहीत. यामध्ये ५०,९१३ मयत, ५६,८८६ गैरहजर, १,०३,३३४ कायमस्वरूपी स्थलांतरित, ८२८ इतर आणि २८,५१६ यापूर्वीच नोंदणी झालेले मतदार आहेत. मयत मतदार वगळता इतर कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये म्हणून ही यादी स्थानिक प्रशासकीय कार्यालये आणि beed.gov.in संकेतस्थळावर अवलोकनासाठी उपलब्ध केली आहे.दावे व हरकती ३० सप्टेंबरपर्यंत स्वीकारणार३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येतील. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांना नाव नोंदणीसाठी नमुना ६ भरावा लागेल. नाव वगळण्यासाठी नमुना ७ आणि नोंदीमध्ये दुरुस्ती वा बदल करण्यासाठी नमुना ८ भरता येईल. हे सर्व अर्ज voters.eci.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध आहेत.अर्जदारांनी वैयक्तिकरीत्या अर्ज सादर करणे आवश्यक असून एकगठ्ठा अर्ज स्वीकारले जाणार नाहीत; मात्र एकाच कुटुंबातील सदस्यांचे अर्ज एकत्रितपणे स्वीकारले जाऊ शकतात. राजकीय पक्षांच्या BLO प्रतिनिधींना एका दिवसात १० दावे/हरकती सादर करण्याची मुभा आहे.मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण१३०० पेक्षा जास्त मतदार असलेल्या मतदान केंद्रांचे विभाजन करण्यात आले असून, सुसूत्रीकरणाच्या प्रक्रियेनंतर बीड जिल्ह्यात आता एकूण २,३९३ मतदान केंद्रे असणार आहेत.नागरिकांसाठी मदत कक्ष (Help Desk)पुनरीक्षण कालावधीत नागरिकांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हास्तरावर मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यासाठी टोल फ्री क्रमांक 1950 व 02442-222185 सुरू करण्यात आले असून ते सकाळी ६:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत कार्यरत राहतील. याशिवाय, निवडणूक आयोगाच्या ECINET ॲपमधील 'Book a call With BLO' या सुविधेचा वापर मतदारांना करता येईल.प्राप्त दावे व हरकतींवर २९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कार्यवाही केली जाईल आणि अंतिम मतदार यादी ०४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.जाहीर आवाहन"बीड जिल्ह्यातील सर्व पात्र मतदारांनी तसेच १ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांनी ३० सप्टेंबरपर्यंत नमुना ६ भरून मतदार यादीत आपले नाव नोंदवावे आणि लोकशाहीच्या या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा," असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी, बीड यांनी केले आहे.


## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०१ सप्टेंबर २०२६


## सरकारी शाळा

मरणासन्न अवस्थेत का,
आली सरकारी शाळा.
म्हणून इंग्रजी शाळेचा,
भरतांना दिसतो पोळा. १

जिल्हा परिषद शाळेने,
दिले अनेक अधिकारी.
आज ते झाले आहेत,
मराठी शाळेचे मारेकरी. २

जिल्हा परिषद शाळेची,
मित्रांनो तऱ्हाच होती न्यारी.
प्रत्येकाच्या जीवाभावाची,
होती बालपणात प्यारी. ३


जिल्हा परिषद शाळेची,
शिस्त होती अति कडक.
चूक केल्यास पुन्हा पुन्हा,
शिक्षा मिळत होती तडक. ४

अशा शिस्तीच्या शाळेला,
आजचा विद्यार्थी मुकला.
इंग्रजी शाळेत प्रवेश घेऊन,
फी साठी पालकास लुटला. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## मराठी साहित्यातील मानदंड, प्रख्यात कादंबरीकार - शिवाजी सावंत




शिवाजी सावंत हे एक प्रसिद्ध मराठी कादंबरीकार होते .शिवाजी सावंत यांच्या प्रमुख कादंबऱ्या " मृत्युंजय " ही कर्णाच्या जीवनावरील अत्यंत प्रसिद्ध आणि पुरस्कर्ते ठरलेली पौराणिक कादंबरी आहे . " युगंधर " श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित ही एक महत्त्वाची आणि गाजलेली कादंबरी आहे, ज्याला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे . " छावा" छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील ही एक लोकप्रिय ऐतिहासिक कादंबरी आहे. शिवाजी सावंत यांचा जन्म ३१ ऑगस्ट १९४० रोजी कोल्हापूर जी. आजरा या गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आजरा येथील ' व्यंकटराव विद्यालयात पूर्ण झाले. शालेय जीवनात ते उत्तम कबड्डीपटू होते. पुढे कोल्हापुरातून त्यांनी वाणिज्य शाखेची डिप्लोमा( GCD) घेतला .सुरवातीला कोर्टात कारकून म्हणून नंतर कोल्हापूरच्या राजाराम प्रशालेत ( १९६२..ते १९७४)शिक्षक म्हणून काम केले . पुढे पुण्यात येऊन त्यांनी ' लोकशिक्षक मासिकाचे सुमारे ६ वर्ष संपादक म्हणून काम पाहिले. भारतीय ज्ञानपिठ साहित्य अकादमीद्वारे दिला जाणारा प्रतिष्ठित पुरस्कार मिळविणारे ते पहिले मराठी लेखक होते. शिवाजी सावंत यांचे निधन दि.१८ सप्टेंबर २००२ रोजी झाले. 'आठवणतील शिवाजी सावंत' हे त्यांच्या जीवनावरील पुस्तक मिलिंद जोशी यांनी लिहिले आहे. त्यामधील शिवाजी सावंत यांच्या विषयीच्या अनेक आठवणी आजच्या युवा पिढीसाठी प्रेरणादायक आहेत.अशा मराठी साहित्यातील मानदंड असलेले प्रख्यात कादंबरीकार शिवाजी सावंत यांच्या जयंती दिनी त्यांना विनम्र अभिवादन.

**- प्रा डॉ राजेंद्र सोनवणे**
**जेइएस महाविद्यालय जालना**


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103


## प्रा. डॉ. अश्विनी नेतने यांना नॅशनल टीचर अवॉर्ड २०२६; शैक्षणिक योगदानाबद्दल राष्ट्रीय सन्मान



**छत्रपती संभाजीनगर :** माका, ता. नेवासा - मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, माका येथील प्राणीशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. अश्विनी सुभाष नेतने यांना 'नॅशनल टीचर अवॉर्ड २०२६' या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.ग्लोबल एलिट मीडिया अँड टेक (Global Elite Media and Tech) या संस्थेच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक उत्कृष्टता आणि मूल्य-आधारित शिक्षण क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणेने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. दि. 30 ऑगस्ट 2026 रोजी त्यांना हा 'सर्टिफिकेट ऑफ ऑनर' प्रदान करण्यात आला.या पुरस्कारामुळे मुळा एज्युकेशन सोसायटी आणि माका महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. डॉ. नेतने यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, प्राचार्य, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस
DMLT — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स
PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) — पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास
C.T.SCAN — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास
E.C.G. — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास
O.T. TECHNICIAN — कालावधी २ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास
PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) — पात्रता : B.Sc. Physics
रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास
9405109103 | 8830838903



१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.
डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903